**ठळक बातम्या**

- मंगळवारपर्यंत होर्मुझची सामुद्रधुनी खुली केली नाही तर इराणच्या ऊर्जा प्रकल्प आणि पुलांवर हल्ला करण्याचा डोनाल्ड ट्रंप यांचा इशारा

- आखातातल्या युद्धामुळे भारतीय अर्थव्यवस्थेचा वृद्धिदर ८ दशांश टक्के कमी होईल असा मूडीजचा अंदाज

- पुदुच्चेरी आणि ४ राज्यातल्या विधानसभा निवडणुकांचा प्रचार शिगेला

- ईस्टरचा सण सर्वत्र भक्तिभावानं साजरा

- आयपीएल क्रिकेट स्पर्धेत हैदराबाद इथं झालेल्या सामन्यात लखनौ सुपर जायंट्सचा सनरायझर्स हैदराबादवर ५ गडी राखून विजय

**आणि**

- आशियाई बॉक्सिंग स्पर्धेत भारताच्या मीनाक्षी हुडा आणि जॅस्मिन लॅम्बोरिया यांची उपांत्य फेरीत धडक

**<><><><><>**

अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रंप यांनी इराणला होर्मुझ सामुद्रधुनी खुली करण्यासाठी दोन दिवसांची अंतिम मुदत दिली आहे. मंगळवारपर्यंत होर्मुझची सामुद्रधुनी खुली केली नाही तर इराणच्या ऊर्जा प्रकल्प आणि पुलांवर हल्ला केला जाईल, असा इशारा ट्रम्प यांनी दिला आहे.

दरम्यान, इराणने पाडलेल्या अमेरिकेच्या एफ - १५ या विमानातल्या कर्मचाऱ्यांची यशस्वीपणे सुटका केल्याचा अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांचा दावा इराणने फेटाळला आहे. दक्षिण इस्फहान इथल्या बचाव मोहिमेत अमेरिकेला अपयश आल्याचं इराणने म्हटलं आहे. उलट या मोहिमेत सहभागी असलेलं अमेरिकन विमान इराणने पाडल्याचं खातम अल अनबिया केंद्रीय मुख्यालयाचे प्रवक्ते इब्राहिम झोल्फाघरी यांनी सांगितलं. जनतेत संभ्रम पसरवण्यासाठी ट्रम्प अशी विधानं करत असल्याचं ते म्हणाले.

**<><><><><>**

मूडीज या पतमानांकन संस्थेनं चालू आर्थिक वर्षासाठी भारतीय अर्थव्यवस्थेच्या वृद्धी दराचा अंदाज ६ पूर्णांक ८ दशांश टक्क्यावरुन ६ टक्क्यापर्यंत खाली आणला आहे. पश्चिम आशियात सध्या सुरु असलेल्या संघर्षामुळे आर्थिक वृद्धीची गती मंदावेल आणि महागाईत वाढ होईल, असा अंदाज मूडीजनं वर्तवला आहे. या युद्धामुळे एलपीजीच्या पुरवठ्यात घट होऊन नजीकच्या काळात घरगुती पातळीवर त्याचा तुटवडा होईल, इंधनाच्या किंमतीत वाढ होऊन वाहतूक खर्चात देखील वाढ होईल, तसंच अन्नधान्याचे दरही वाढतील असं मूडीजनं आपल्या अहवालात म्हटलं आहे.

**<><><><><>**

पुदुच्चेरी आणि ४ राज्यातल्या विधानसभा निवडणुकांसाठी प्रचार शिगेला पोहोचला आहे. ऐकूया याविषयी एक वृत्तांत…

व्हीसी

*(पहिल्या टप्प्यात आसाम, केरळ आणि पुदुच्चेरी इथं येत्या गुरुवारी ९ एप्रिलला मतदान होणार असून पश्चिम बंगालमध्ये २३ आणि २९ तारखेला दोन टप्प्यांत मतदान होणार आहे. निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर सर्वच राजकीय पक्षांनी आपापल्या उमेदवारांसाठी प्रचाराचा धडाका लावला आहे. भाजपाचे ज्येष्ठ नेते, प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी आज पश्चिम बंगालमध्ये कूचबिहार इथं जाहीर सभा घेतली. तृणमूल काँग्रेसच्या राज्यात महिला सुरक्षित नसल्याची टीका मोदी यांनी यावेळी केली.*

**- - होल्ड - बाईट - PM on women security - -**

*तृणमूल काँग्रेसच्या प्रमुख आणि पश्चिम बंगालच्या मुख्यमंत्री ममता बॅनर्जी आपल्या उमेदवारांच्या समर्थनार्थ राज्याच्या विविध भागांत सभा घेत आहेत. तृणमूल काँग्रेसचे ज्येष्ठ नेते अभिषेक बॅनर्जी यांनी पूर्व वर्धमान जिल्ह्यात रैना इथं प्रचार सभा घेतली. केरळमध्ये काँग्रेस नेते राहुल गांधी यांनी अलपुळ्ळा, इदुक्की आणि एर्नाकुलम इथं सभा घेतल्या. यावेळी त्यांनी एलडीएफ आणि रालोआवर टीका केली. मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्षाचे सरचिटणीस एम ए बेबी आणि सुभाषिणी अली यांनीही डाव्या आघाडीच्या उमेदवारांच्या प्रचारासाठी विविध मतदारसंघात सभा घेतल्या. केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांनी आज केरळममधे बैपोर तसंच एर्नाकुलम मतदारसंघात राष्ट्रीय लोकशाही आघाडीच्या उमेदवारांसाठी प्रचार केला.*

*गोव्यातल्या फोंडा, कर्नाटकातल्या बागलकोट आणि दावणगिरी दक्षिण तसंच नागालँडमधल्या कोरिडांग आणि त्रिपुरातल्या धर्मनगर विधानसभा मतदारसंघातही येत्या ९ एप्रिलला पोटनिवडणुकीसाठी मतदान होणार आहे. धर्मनगर इथं मुसळधार पाऊस आणि वादळ असूनही राजकीय पक्षांनी जोरदार प्रचार केला. भाजपानं आपल्या उमेदवाराच्या समर्थनार्थ बाईक रॅली काढली तर माकप आणि काँग्रेसच्या उमेदवारांनी घरोघरी जाऊन प्रचार केला.)*

<><><><><>

जगभरात आज ईस्टरचा सण मोठ्या उत्साहात साजरा होत आहे. वेटिकन सिटीमध्ये पोप लिओ चौदावे यांनी काल बेसिलिका मध्ये ईस्टर प्रार्थना केल्यानंतर जगभरात ईस्टर सणाला सुरुवात झाली.

पोप यांनी जागतिक पातळीवरच्या अशांततेच्या वातावरणात शांततेसाठी आणि बंधुत्वासाठी प्रार्थना केली. प्रभू येशू ख्रिस्ताला सुळावर चढवल्यानंतर त्यांचं याच दिवशी पुनरुथ्थान झाल्याच्या आनंदाप्रित्यर्थ हा सण साजरा केला जातो.

राष्ट्रपती द्रौपदी मुर्मु यांनी देशवासीयांना ईस्टरच्या शुभेच्छा दिल्या आहेत. हा दिवस सत्य, त्याग आणि प्रेमाचा संदेश देणारा आहे असं त्यांनी आपल्या शुभेच्छा संदेशात म्हटलं आहे. उपराष्ट्रपती सी पी राधाकृष्णन आणि प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी  यांनीही ईस्टरच्या शुभेच्छा दिल्या आहेत.

महाराष्ट्राचे राज्यपाल जिष्णुदेव वर्मा, मुख्यमंत्री देवेंद्र फडनवीस यांनीही ईस्टरनिमित्त शुभेच्छा दिल्या आहेत. राज्यात अनेक ठिकाणी आज चर्चमधे आज विशेष प्रार्थना आणि प्रवचनांचं आयोजन करण्यात आलं.

<><><><><>

आयपीएल क्रिकेट स्पर्धेत आज हैदराबाद इथं झालेल्या सामन्यात लखनौ सुपर जायंट्सनं सनरायझर्स हैदराबादवर ५ गडी राखून विजय मिळवला. लखनौ सुपर जायंटसनं नाणेफेक जिंकून प्रथम क्षेत्ररक्षण करायचा निर्णय घेतला, तो अचूक ठरला. हेन्रीच क्लासनच्या ६२ आणि नीतीशकुमार रेड्डीच्या ५६ धावा वगळता सनरायझर्स हैदराबादच्या इतर फलंदाजांना चांगली कामगिरी करता आली नाही. त्यांचा डाव निर्धारित २० षटकात ९ बाद

१५६ धावांवर संपला. लखनौ सुपर जायंट्सनं ही धावसंख्या ५ गडी गमावून, सामन्यातला एक चेंडू बाकी असताना पार केली.

या स्पर्धेतला आजचा दुसरा सामना बंगळुरू इथं रॉयल चॅलेंजर्स बंगळुरू आणि चेन्नई सुपर किंग्ज यांच्यात सुरु आहे. चेन्नई सुपर किंग्जनं नाणेफेक जिंकून प्रथम क्षेत्ररक्षण करायचा निर्णय घेतला आहे.

शेवटची बातमी हाती आली तेव्हा रॉयल चॅलेंजर्स बंगळुरूच्या ८ षटकात १ बाद ७६ धावा झाल्या होत्या.

**<><><><><>**

मंगोलियात उलानबतार इथे सुरू असलेल्या आशियाई बॉक्सिंग अजिंक्यपद स्पर्धेत भारताच्या मीनाक्षी हुडा आणि जॅस्मिन लॅम्बोरिया यांनी उपांत्य फेरीत धडक मारली आहे. महिलांच्या ४८ किलो वजनी गटात मीनाक्षी हुडाने जपानच्या युका सदामत्सुचा ५-० असा पराभव केला. तर महिलांच्या ५७ किलो वजनी गटात जॅस्मिन लॅम्बोरियाने चीनच्या झी यी चेन हिच्यावर ५-० अशी एकतर्फी मात केली. या स्पर्धेत पुरुषांच्या गटात लोकेश, आकाश आणि हर्ष चौधरी यांनीही उपांत्य फेरीत प्रवेश केला आहे.

**<><><><><>**

माजी उप प्रधानमंत्री जगजीवनराम यांच्या जयंतीनिमित्त त्यांना देशभरातल्या मान्यवरांनी आज अभिवादन केलं.

नवी दिल्लीमधल्या दिल्ली गेट इथल्या जगजीवनराम यांच्या समाधीस्थळावर जाऊन माजी राष्ट्रपती रामनाथ कोविंद, माजी लोकसभा सभापती मीरा कुमार, केंद्रीय सामाजिक न्याय राज्यमंत्री बी. एल. वर्मा, खासदार मनोज कुमार यांनी पुष्पहार अर्पण करून अभिवादन केलं. तसंच जगजीवनराम यांच्या स्मृतीप्रीत्यर्थ आयोजित सर्व धर्म प्रार्थना सभेलाही या सर्व नेत्यांनी हजेरी लावली.

**<><><><><>**

भारताचं सागरी क्षेत्र अधिक वेगाने आणि जोमाने वाटचाल करत आहे, असं प्रतिपादन प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी केलं आहे. आज राष्ट्रीय सागरी दिनानिमित्त ते समाज माध्यमावरच्या संदेशात म्हणाले की, भारताचा सागरी वारशाचं देशाच्या अर्थव्यवस्थेत अमूल्य योगदान आहे.

भारत समृद्ध भविष्यासाठी आपल्या सागरी क्षेत्राच्या प्रचंड क्षमतेचा उपयोग करत राहील, असं प्रधानमंत्री नरेंद्र मोदी म्हणाले.

**//<><><><><>//**